# ECHO OF HIS CALL

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHAUL BENJAMIN SHINDE

VOL: XXVIII | YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, 2026 APRIL | No. 03


### पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

**स्तोत्रसंहिता १४८: ७-१४**

७. पृथ्वीवरून यहोवाला स्तवा; समुद्रातील मोठमोठ्या जिवांनो, आणि सर्व अगाधांनो,

८. अग्नी व गारा, हिम व धुके, त्याचे वचन पूर्ण करणारे वादळ,

९. पर्वत व सर्व डोंगर, फल देणारी झाडे व सर्व गंधसरू,

१०. श्वापदे व सर्व गुरे, सरपटणारे जीव व उडणारे पक्षी,

११. पृथ्वीतले राजे आणि सर्व लोक, अधिपती आणि पृथ्वीतले सर्व न्यायाधीश,

१२. कुमार व कुमारी, म्हातारे व तरणे,

१३. ही सर्व यहोवाचे नाव स्तवोत, कारण त्याचे नाव मात्र उंचावलेले आहे; त्याचे ऐश्वर्य पृथ्वी व आकाशे यांच्या वर आहे.

१४. आणि त्याने आपल्या लोकांचे शिंग उभारले आहे; तो आपल्या सर्व भक्तांची, म्हणजे जे लोक त्याच्याजवळ आहेत त्या इस्राएलाच्या संतानांची प्रशंसा आहे. हाल्लेलूया.



## देवाच्या मौनावस्थेतही तुमच्यासाठी त्याचे कार्य सुरू आहे.

GOD IS WORKING FOR YOU THROUGH HIS SILENCE!



*- सिस्टर अँजेलिन*



आपला प्रभू आणि तारणारा येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थित नावाने माझ्या विस्तारित **एको ऑफ हिज कॉलच्या** परिवारातील सर्व सदस्यांना प्रेमळ शुभेच्छा. माझ्या जीवनात प्रभू मला जे सांगत आहे आणि ज्या गोष्टींविषयी तो माझ्याबरोबर कार्य करीत आहे, त्या तुमच्याबरोबर सामायिक करणे मला नेहमीच फार आनंद देणारे असते. मी आशा करते आणि प्रार्थना करते की, मी जे लिहिते ते तुम्हाला विश्वासाने पुढे जाण्यास प्रोत्साहित करील, मग जरी तुम्ही कोणत्याही परिस्थितीत असलात तरी, कारण जर तो माझ्यासाठी करू शकतो, तर तो नक्कीच तुमच्यासाठीही करील. या शब्दांनी आपण एकमेकांना प्रोत्साहित करूया आणि पुढे विजयाकडे वाटचाल करूया!

**तो उठला आहे!!**

''तो उठला आहे!'' - किती सामर्थ्यशाली घोषणा आहे ही! हेच आपल्या ख्रिस्ती विश्वासाचे मूलभूत अधिष्ठान आहे. आपण पुनरुत्थित ख्रिस्ताच्या सामर्थ्यावर मनन करीत असताना, हा लेख पुढे वाचत असता, तो तुमच्या परिस्थितीत तुमच्याशी बोलत राहो ही माझी प्रार्थना आहे.

(...पान २ वर)




एको ऑफ हिज कॉल

यू ट्युब ख्रिश्चन चॅनल !

पास्टर सॅम सेल्वा राज यांच्या सोबत प्रार्थनेत

सहभागी होण्याची संधी

पाच मिनिटांचा संदेश

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

प्रतिदिनी - पहाटे २.०० वाजल्या पासून

रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

✻ कृपा करून सबस्क्राईब करा ✻

ECHO OF HIS CALL - (Marching towards 60th year)
Estd. 1969



# तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



## आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.

HON. EDITOR-IN-CHIEF
Rev. Dr. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.
EX MANAGING EDITOR
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.
GENERAL MANAGER
Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM, MBA.
ADMINISTRATION
Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)
EDITORIAL BOARD
Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Rev. Dr. K.R. Rajasekaran
Rev. Dr. William Robert, Ph.D., DD, D.Lit.

EDITOR, PUBLISHER & PRINTER
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858 95661 31858
E.MAIL
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
WEBSITES
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.org
YOUTUBE CHANNEL
Echo of His Call

''.......... इस्राएलांचे हाल पाहून त्याच्या मनाला खेद झाला'' - शास्ते १०:१६

माझ्या प्रिय मित्रांनो,

आपला देव चांगला आहे, आणि तो सदासर्वकाळ जिवंत आहे. तुमच्या मधून नवे कार्य घडवून आणण्याच्या उद्देशाने तो तुम्हाला आपल्या मार्गाने चालवितो. जीवनाच्या वाटेवर तुम्ही अडखळता, तरी तो तुम्हाला आधार देण्यासाठी आणि स्थिर करण्यासाठी आपला हात पुढे करतो. तुम्ही ज्या वेदनादायक अनुभवांतून गेले आहात, त्यांची आठवण ठेवून त्याचे हृदय तुमच्याबद्दल कळवळते. म्हणून धैर्य धरा - तुमच्या सुटकेचे दिवस जवळ येत आहेत.

**''मग इस्राएल लोकांनी परमेश्वराच्या दृष्टीने वाईट ते पुन्हा केले; बआलीम व अष्टारोथ ह्या दैवतांची आणि अराम, सीदोन, मवाब, अम्मोनी व पलिष्टी ह्या सर्वांच्या दैवतांची ते सेवा करू लागले; त्यांनी परमेश्वराचा त्याग केला; त्याची सेवा ते करीनात''** - शास्ते १०:६

इस्राएली लोकांनी देवापासून दूर जाऊन परक्या देवतांची सेवा केली म्हणून प्रभू त्यांच्यापासून दूर झाला. परिणामी, त्यांच्या शत्रूंनी त्यांचा अत्यंत छळ केला. परंतु जेव्हा त्यांनी आपले पाप स्वीकारले आणि पूर्ण अंतःकरणाने त्याच्याकडे परतले, तेव्हा प्रभूने त्यांच्यावर दया करून त्यांची सुटका केली. त्या राष्ट्राने पुन्हा एकदा विजय आणि शांततेचा आनंद अनुभवला.

**''अम्मोनी लोक यार्देन ओलांडून यहूदा, बन्यामीन व एफ्राईमाचे घराणे ह्यांच्यावर स्वाऱ्या करीत. ह्यामुळे इस्राएल लोक फार बेजार झाले होते. मग इस्राएल लोकांनी परमेश्वराचा धावा करून म्हटले, आम्ही आमच्या देवाचा त्याग केला आणि बाल दैवतांची सेवा करून आम्ही तुझ्याविरुद्ध पाप केले आहे.''** - शास्ते १०:९-१०.

इस्राएली लोकांचा आक्रोश ऐकून प्रभूच्या मनाला दुःख झाले आणि त्यांना छळवणूक करणाऱ्यांच्या हातातून सोडविले.

**''मग ते आपल्यांतील परके देव टाकून देऊन परमेश्वराची सेवा करू लागले. इस्राएलांचे हाल पाहून त्याच्या मनाला खेद झाला.''** - शास्ते १०:१६.

तुम्ही तुमचे दुःख एकटेच सहन करीत नाही; तुम्ही अनुभवत असलेल्या दुःखांत देवही सहभागी होतो. तुमच्या संघर्षांची तीव्रता कदाचित कुणालाही पूर्णपणे समजणार नाही, पण देव ती पूर्णपणे जाणतो. निराश होऊ नका. दृढ राहा आणि धैर्यवान बना. प्रभू तुमच्यासाठी एक विलक्षण चमत्कार घडवून आणील.

देवाच्या कृपेने **नहेम्या बायबल कॉलेजची** सेवाकार्ये उत्तम रीतीने सुरू आहेत, आणि त्याच्या दृढ विश्वासूपणा व मार्गदर्शनाबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत.

आम्हाला हे जाहीर करताना आनंद होत आहे की, आमच्या कॉलेजला आता **नेशन्स असोसिएशन फॉर थिऑलॉजिकल ॲक्रेडिटेशन (नाटा)** कडून मान्यता मिळाली आहे. ही महत्त्वपूर्ण कामगिरी आमच्या शैक्षणिक दर्जाला अधिक बळकटी देण्यासाठी आणि आमच्या सेवाकार्याचा प्रभाव अधिक व्यापक करण्यासाठी पुढे टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे.



*वरिष्ठ पाळक श्रीकुमार (माजी विद्यार्थी) नहेम्या बायबल कॉलेजचे विद्यार्थी यांच्यासोबत.*

याव्यतिरिक्त, चालू शैक्षणिक वर्षापासून आम्ही **बॅचलर ऑफ थिऑलॉजी (B.Th.)** हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. हा नवीन अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना भक्कम पवित्र शास्त्र विषयक ज्ञान, सखोल धर्मशास्त्रीय अभ्यास आणि व्यवहार्य सेवाकार्याचे प्रशिक्षण अधिक प्रभावीपणे देण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

२४ जानेवारी रोजी आम्ही महाबलीपूरम येथे विद्यार्थ्यांसाठी एक विशेष शिबीर आयोजित केले होते. या आत्मिकदृष्ट्या समृद्ध करणाऱ्या सभेत सॅम्युएल ऍरॉन यांनी



*महाबलीपुरम येथे आयोजित करण्यात आलेले आमच्या नहेम्या बायबल कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे विशेष शिबीर.*

ख्रिस्ताशी जवळीक या विषयावर देवाच्या वचनाद्वारे सेवा केली. त्या सत्रांमुळे मोठे आत्मिक उन्नतीकरण झाले. अर्थपूर्ण सहवास, उत्साहवर्धक स्तुती-आराधना आणि येशू ख्रिस्त केंद्रित समृद्ध शिक्षण यांद्वारे आमचे विद्यार्थी अधिक बळकट व प्रोत्साहित झाले.

बायबल कॉलेजच्या सेवाकार्यासाठी आपण नियमित प्रार्थना करीत राहावी अशी आम्ही आपणांस नम्र विनंती करतो. कृपया तुमच्या प्रार्थनेत आमची आठवण ठेवा. येणाऱ्या शैक्षणिक वर्षात चांगल्या संख्येने नवीन विद्यार्थी रुजू व्हावेत आणि ही संस्था प्रभूच्या गौरवासाठी सतत उपयोगी पडावी यासाठी प्रभूकडे प्रार्थना करा.

येशू ख्रिस्तामधील तुमचा सेवक,

**पास्टर एस्. सॅम सेल्व राज,**
E.mail: sam@echoofhiscall.org

## सूचना

कृपया आमचे मोबाईल क्रमांक (+९१) ९८४१० ७१८५८, (+९१) ९८४१२७१८५८ (मुख्य क्रमांक) आपल्या मोबाईल फोनमध्ये जतन करून ठेवा.

**– संपादक**

(पान १ वरुन...)

उत्तम शुक्रवार आणि ईस्टरची कथा हजारो वर्षांपूर्वीच सांगितली गेली होती; खरं तर, जगाच्या पायाभरणीपूर्वीच. ती मानवी इतिहासातील सर्वात मोठी घटना आहे. ऐतिहासिकदृष्ट्या, वैज्ञानिकदृष्ट्या आणि आत्मिकदृष्ट्या देखील, ही घटना आजही जगभरातील लोकांच्या हृदयांना स्पर्श करते.

पुनरुत्थानाची कथा बहुतेकदा तीन दिवसांच्या कालावधीमधील सांगितली जाते: उत्तम शुक्रवार, मौनाचा शनिवार आणि पुनरुत्थानाचा रविवार.

## अत्यंत महत्त्वाची सूचना!




नजीकच्या भविष्यात **एको ऑफ हिज कॉल**च्या पोस्टल डिस्पॅचमध्ये अपरिहार्य व्यत्यय येऊ शकतात. जर आपल्याला कोणताही व्यत्यय न येता **एको ऑफ हिज कॉल** प्राप्त करणे सुरु ठेवायचे असेल तर कृपया आम्हाला आपले नाव, पत्ता, ईमेल आणि व्हॉटस एप नंबर याची माहिती पत्राद्वारे, ईमेल, फोन कॉल किंवा एस एम एस/व्हॉटस एप संदेशाद्वारे तावडतोब पाठवा.

तुमच्या पाठिंब्यामुळे आम्हाला तुमची चांगली सेवा करण्यास मदत होते!

**आमचा पत्ता:**

**एको ऑफ हीज कॉल**
**१०, मोहम्मद अब्दुल्ला २ री गल्ली, चेपॉक, चेन्नई-६००००५, भारत**
**Cell: (+91) 98412 71858 / 98410 71858 E.mail: sam@echoofhiscall.org**

आपण उत्तम शुक्रवाराबद्दल खूप बोलतो आणि पुनरुत्थानाच्या दिवशी आनंद साजरा करतो. पण मौन शनिवाराबद्दल काय? मी त्याला मौन असे म्हणते, कारण त्या दिवसाबद्दल पवित्र शास्त्रात खूपच कमी भाष्य करण्यात आलेले आहे. कोणतीही नाट्यमय घटना नोंदवलेली नाही. तो दिवस शांत आहे. तो दिवस स्थिर आहे. त्यादिवशी कोणतीही दृश्यमान हालचाल दिसून येत नाही.

अनेकजण कल्पना करतात की, अजूनही त्या दिवशी येशू क्रूसावर लटकत आहे; शिष्यांसाठी ती एक वेदनादायक आठवण होती की:

- **अभिवचन मोडल्याची वेदना**
- **शिक्षेची जागा आणि लज्जा**
- **अपयश आणि पराभवाचे चित्र**
- **मागे फिरण्याचा कोणताही मार्ग नसलेला क्षण**

उत्तम शुक्रवार आपल्या अंत:करणाला दुखावतो. पुनरुत्थित रविवार आपल्याला उंचावतो, परंतु मौन शनिवार आपल्याला घडवतो.

तो असा दिवस आहे की, ज्या दिवशी काहीही घडत नाही असे वाटते, परंतु प्रत्यक्षात सर्व काही घडत असते. त्या दिवशी देव काहीही बोलत नाही, मात्र तरीही त्याची योजना उलगडत असते. त्या दिवशी सर्वकाही शांत आहे असे जगाला दिसते, मात्र तरीही स्वर्गात हालचाल होत असते.

## १. शनिवार हा असा दिवस आहे जो आपल्याला समजत नाही

जरी येशूने स्पष्टपणे म्हटले होते की, '**तीन दिवसांनी मी पुन्हा उठेन**' (मार्क ८:३१), मात्र शुक्रवारच्या मानसिक आघाताने त्या अभिवचनाचा आवाज दडपला गेला.

**शनिवार हा तो दिवस आहे जेव्हा:**

- देव जणू लपलेला आहे असे वाटते
- प्रार्थना अनुत्तरीत वाटतात
- विश्वास कमकुवत झाल्यासारखा वाटतो.

शिष्य पूर्णपणे खचून गेले होते. येशूचा मृत्यू झाला होता. त्यांच्या स्वप्नांचा, आशांचा आणि विश्वासाचा चुराडा झाला होता, आणि ते सर्व त्याच्यासोबत जणू कबरेत पुरले गेले होते. जर त्यांच्या गुरूचे असे भवितव्य होते, तर त्यांचे भवितव्य कसे होणार होते? त्या शनिवारच्या सकाळी दु:ख, वेदना, भीती आणि संभ्रम यांनी वातावरण भरून गेले होते. भग्न अंत:करणाने आणि भयभीत होऊन ते बंद दरवाज्यांच्या मागे लपून बसले.

आपल्यापैकी अनेक जण आपल्या स्वत:च्याच ''शनिवार'' मध्ये जगत आहेत; ते स्वत:ला जगापासून दूर करीत आहेत.

हा संदेश तुमच्यासाठी आहे!

येशू त्यांच्या बंद खोलीत आला आणि तो एकच शब्द बोलला: ''शांती''. मी प्रार्थना करतो की, तुमच्या या मौन ''शनिवार'' करिता देवाचा हा भविष्यसूचक शब्द असेल - ''शांती''.



*येशू म्हणाला, तुम्हांस शांती असो.*

''...........**शिष्य होते तेथील दारे यहुद्यांच्या भयामुळे बंद असता, येशू आला व मध्ये उभा राहून त्यांना म्हणाला, तुम्हांस शांती असो**'' - योहान २०:१९.



*देवाच्या मौन धारणेनंतर चमत्कार घडला!*

योसेफला देवाकडून स्वप्ने मिळाली, तरीही तो प्रथम खड्ड्यात आणि नंतर तुरुंगात सापडला. कोणताही आवाज नाही. कोणतेही स्पष्टीकरण नाही. कुठलीही स्पष्टता नाही. पण देव त्याला त्याच्या उद्देशासाठी उभे करण्यासाठी पडद्यामागे काम करीत होता.

जेव्हा इस्राएली लाल समुद्रासमोर उभे होते व त्यांच्या मागे फारोचे सैन्य होते आणि दोन्ही बाजूंना पर्वत होते, **तेव्हा भीती आणि संशय यांनी त्यांना ग्रासले. देव जणू शांत असल्यासारखा वाटत होता, तरी त्या शांततेत तो एक चमत्कार घडवण्याची योजना आखत होता** (निर्गम १४:१३:१४).

शनिवार आपल्याला आठवण करून देतो की, मौन धरणे म्हणजे त्याग करणे नाही.

## २. अंधारलेल्या काळात देव त्याचे सर्वात गूढ कार्य करीत असतो!

जेव्हा आपल्याला काहीच दिसत नाही, तेव्हाच देव अनेकदा सर्वात सामर्थ्याने कार्य करत असतो.



*देवाची निर्मिती*

''**प्रारंभी देवाने आकाशे आणि पृथ्वी ही अस्तित्वात आणली. आणि पृथ्वी उजाड व अस्ताव्यस्त होती; आणि जलाशयावर अंधार होता; आणि देवाचा आत्मा जलावर हालत राहिला**'' - उत्पत्ती १:१-२.

अंधाराने सर्व काही झाकले होते, तरीही देवाचा आत्मा तेथे जलावर हालत राहिला; जरी तो दिसत नव्हता, तरी तो कार्य करत होता.

जेव्हा तुमच्या प्रार्थना अनुत्तरीत वाटतात......

जेव्हा तुमच्या यशाला उशीर होतो.......

(...पान ६ वर)

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

ओझी वाहणे (गलती ६:२), गरजा भागविणे (रोम १२:१३), आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

स्तुती आणि प्रार्थनेचे विषय - १९ एप्रिल, २०२६ पासून ते १८ मे, २०२६

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

## ✝ याकरीता देवाची स्तुती करा...

१९ एप्रिल - आमचे वरिष्ठ पास्टर एस. सॅम सेल्वा राज यांच्या **५ मिनिटांच्या यूट्यूब संदेशांद्वारे** सामायिक केलेल्या साक्षींबद्दल देवाची स्तुती करा.

२० एप्रिल - आमचे सर्व सहाय्यक संपादक आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी देवाची स्तुती करा.

२१ एप्रिल - आमच्या प्रार्थनेतील सहभागीदार, सदस्यत्व घेतलेले सहभागीदार, विश्वासामधील सहभागीदार, जीवनभर सोबत करणारे सहभागीदार, महान सेवाकार्याचे सहभागीदार, विनंती अर्ज पाठवणारे सहभागीदार आणि त्यांच्या कुटुंबियांवर देवाने केलेल्या कृपेबद्दल देवाची स्तुती करा.

२२ एप्रिल - आमच्या सर्व मंडळ्या, संडे स्कूल, युवकांमधली सेवा आणि रुग्णालयातील सेवा यांना देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

२३ एप्रिल - आमच्या **बायबलकोर (बायबल कॉरस्पॉन्डन्स कोर्सेस)** आणि **आमच्या थिऑलॉजिकल कॉरस्पॉन्डन्स कोर्सेसला** देव सतत देत असलेल्या आशीर्वादांबद्दल देवाची स्तुती करा.

२४ एप्रिल - आमच्या संस्थेला समर्पित आणि पात्र नवीन उमेदवारांची भरती करण्यासाठी देवाने जे मार्गदर्शन केले त्यासाठी देवाची स्तुती करा.

२५ एप्रिल - आमच्या सर्व राज्य समन्वयकांना आणि त्यांच्या कुटुंबियांना देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

२६ एप्रिल - आमच्या मिशन कार्यकर्त्यांची अढळ वचनबद्धता यासाठी देवाची स्तुती करा.

२७ एप्रिल - **एको ऑफ हिज कॉच्या आमच्या यूट्यूब चॅनेलवर** देवाचे आशीर्वाद असोत, ज्यामुळे ते बहुभाषिक लोकांपर्यंत पोहोचू शकेल यासाठी देवाची स्तुती करा.

२८ एप्रिल - २०२५-२०२६ च्या आर्थिक वर्षाला देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

२९ एप्रिल - आपल्या मंडळीच्या सर्व कार्यात तरुण उत्साहाने सहभाग करीत आहे या आशीर्वादासाठी देवाची स्तुती करा.

३० एप्रिल - **सेंट पॉल्स मॅट्रिक्युलेशन स्कूलच्या** विद्यार्थ्यांना देवाने आशीर्वादित केले, ज्यामुळे त्यांना आपली १० वीची परीक्षा यशस्वीपणे पूर्ण करता आली.

०१ मे - आपले वरिष्ठ पाळक एस. सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबियांना देवाने सर्वप्रकारच्या दुष्ट प्रभावापासून सुरक्षित ठेवले यासाठी देवाची स्तुती करा.

०२ मे - आपल्या संस्थेतील सर्व कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांना देवाने आशीर्वादित केले व संरक्षण दिले यासाठी देवाची स्तुती करा.

०३ मे - १० एप्रिल २०२६ रोजी झालेल्या **सेंट पॉल्स मॅट्रिक्युलेशन स्कूलच्या** वार्षिक दिन समारंभाला देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

## ✝ कृपया यासाठी प्रार्थना करा...

०४ मे - आपल्या सर्व सहाय्यक संपादक आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी कृपया प्रार्थना करा.

०५ मे - आपल्या संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांमध्ये एकता आणि एकवाक्यता राहावी यासाठी कृपया प्रार्थना करा.

०६ मे - शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी आपल्या निवासी आणि संध्याकाळी चालणाऱ्या **नहेम्या बायबल कॉलेजमध्ये** पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश मिळावा यासाठी कृपया प्रार्थना करा.

०७ मे - शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी **सेंट पॉल्स मॅट्रिक्युलेशन स्कूलमध्ये** नवीन विद्यार्थ्यांना प्रवेश मिळावा यासाठी कृपया प्रार्थना करा.

०८ मे - आपल्या सर्व सेवाकार्यासाठी लागणाऱ्या आर्थिक गरजांची देवाने पूर्तता करावी यासाठी कृपया प्रार्थना करा.

०९ मे - आपल्या गॉस्पेल प्रिंटिंग प्रेसवर आणि त्याच्या दैनंदिन कामकाजावर देवाचे आशीर्वाद असावेत यासाठी कृपया प्रार्थना करा.

१० मे - सर्व मंडळ्यांनी आत्मे जिंकावे आणि खऱ्या अर्थाने आध्यात्मिक जागृतीचा अनुभव घ्यावा यासाठी कृपया प्रार्थना करा.

११ मे - ४जुलै २०२६ रोजी होणाऱ्या आपल्या नहेम्या बायबल कॉलेजच्या पदवीदान समारंभाला देवाने आशीर्वादित करावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

१२ मे - आपले वरिष्ठ पाळक एस. सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबियांचे देवाने सर्व प्रकारच्या दुष्ट प्रभावांपासून सुरक्षित ठेवावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

१३ मे - सेवाकार्ये आणि मिशनऱ्यांवर होणाऱ्या सर्व अत्याचारांचा शेवट व्हावा यासाठी कृपया प्रार्थना करा.

१४ मे - जगभरातील तीव्र हवामान परिस्थितीतही देवाचे दैवी संरक्षण लाभावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

१५ मे - या नवीन आर्थिक वर्षात देवाचे दिव्य मार्गदर्शन मिळावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

१६ मे - देवाला भय मानणारे आणि त्याचा आदर करणारे नेते राष्ट्रांना लाभावेत यासाठी कृपया प्रार्थना करा.

१७ मे - उत्तर भारतातील आपल्या मिशनऱ्यांना, देवाच्या सेवकांना आणि त्यांच्या कुटुंबियांना चांगले आरोग्य लाभावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

१८ मे - **एको ऑफ हिज कॉलच्या यूट्यूब चॅनेलसाठी** नवीन सदस्यांची वाढ व्हावी यासाठी कृपया प्रार्थना करा.

(पान ४ वरुन)

जेव्हा तुमचे हृदय वाट पाहत असते.......देव तरीही पडद्यामागे कार्य करीत असतो.

मौन शनिवारी शिष्य शोक करीत असताना, येशू निष्क्रिय नव्हता. पवित्र शास्त्र उघड करते की तो:

**पहिल्याने पृथ्वीच्या खालील भागांमध्ये तो उतरला** (इफिस ४:९).

**त्याने सत्तांस आणि अधिकारांस निःशस्त्र केले** (कलस्सै २:१५).

**त्याने मृतलोकाच्या आणि मरणाच्या किल्ल्या आपल्या हातात घेतल्या** (प्रकटी १:१८).

जगाला मौनावस्था दिसत होती.

स्वर्गाने विजय पाहिला!

कदाचित तुम्हाला असे वाटू शकते की, देव शांत आहे, पण खात्री बाळगा, तो तुमच्या अंधारलेल्या शनिवारी तुमच्या विजयी रविवारची तयारी करण्यासाठी काम करीत आहे. माझ्या प्रिय भावांनो आणि बहिणींनो, निराश होऊ नका. शांतता आणि अंधार दिसत असला तरी त्याचा अर्थ असा नाही की देव कार्य करीत नाही.

योना मासाच्या पोटात तीन दिवस आणि तीन रात्री राहिला. ते दिवस शिक्षा असल्यासारखे वाटत होते, पण ते तयारीचे दिवस होते; देव त्याच्या हृदयाला एका मोठ्या मिशनसाठी पुन्हा घडवत होता.

दानीएलाने सिंहांच्या गुहेत एक मौन रात्र घालवली. **पण देव सिंहांची तोंडे बंद करण्यात व्यस्त होता** – (दानीएल ६:२२). देव तुमच्या विरोधात उठणारे प्रत्येक तोंड, प्रत्येक योजना बंद करीत आहे आणि प्रत्येक बाण थोपवत आहे. तो अंधारातही कार्य करीत आहे.



*दानीएलाने सिंहाच्या गुहेत एक मौन रात्र घालवली.*

## ३. शनिवार आपल्याला पुराव्याशिवाय विश्वास ठेवण्यास शिकवतो!

रविवारचा विश्वास म्हणजे विजयाचा उत्सव आहे.

शनिवारचा विश्वास म्हणजे समर्पणाचा दिवस आहे.

शनिवारचा विश्वास म्हणतो:

- "मला अजून काही दिसत नाही, तरीही देव विश्वासू आहे."
- "मला अजून ते जाणवत नाही, तरीही त्याचे वचन अढळ आहे."
- "मला अजून हे समजत नाही, तरीही देव चांगलाच आहे."

अब्राहाम इसहाकाची प्रतीक्षा करीत होता. देवाने मुलाचे वचन दिले होते, पण अनेक वर्षे काहीच घडत नाही असे दिसत होते. रोम ४:२० म्हणते, **"तरी तो....... अविश्वासाने डळमळला नाही....."** शनिवारच्या काळात अढळ विश्वास तयार होतो. अब्राहामासाठी असा अढळ विश्वास ठेवणे सोपे होते असे तुम्हाला वाटते का? जैविकदृष्ट्या ते अशक्य होते. लोकांनी कदाचित त्याला विचारले असेल की, तुला हे खरोखर माहित आहे का की, हे नक्की देवाचेच वचन आहे, किंवा मग हे तुझे मनसुबे आहेत? दररोज साराला पाहत असता त्याचे मन खचले असते, पण तरीही तो देवाच्या त्या अभिवचनाला घट्ट धरून राहिला.

तुम्ही जे पाहता त्यामुळे तुमचा विश्वास डळमळीत होऊ देऊ नका. तुम्हाला सारा शारीरिकदृष्ट्या थकलेली दिसेल, पण त्या प्रसंगाला तुम्ही तुमच्या आत्मिक डोळ्यांनी पहा. ज्याने वचन दिले आहे तो वचन पाळणारा आहे. फक्त त्यामुळेच अब्राहामाचा शनिवारचा दिवस एका अशा चमत्काराने संपला, ज्याने जगाच्या इतिहासाची दिशा ठरवली.

प्रिय मित्रांनो, तुम्हाला कोणत्याही पुराव्याची गरज नाही, त्याच्यावर विश्वास ठेवा. त्याला घट्ट धरून राहा; एका चमत्काराने तो तुमच्या शनिवारच्या दिवसाला पूर्णविराम देईल. तुमचे शनिवारच तुमच्या विश्वासाच्या मूळांना बळकटी देतील.

## ४. शनिवार आपल्याला पुनरुत्थानासाठी तयार करतो!

आपल्यापैकी बरेच जण हे विसरतात की, शनिवार हा रविवारी घडणाऱ्या महान चमत्काराची तयारी करण्याचा दिवस आहे. जर रविवार लवकर आला, तर आपण त्या परिवर्तनाची अनुभूती हरवून बसू, जे प्रतिक्षेने निर्माण होते. शनिवार फक्त

(पान ९ वर)

नहेम्या बायबल कॉलेजेस

चेपॉक आणि संतोषपुरम, वेलाचेरी, चेन्नै

प्रवेशा करिता त्वरा करा !

शैक्षणिक पात्रता :
१० वी इयत्ता आणि अधिक

माध्यम : तमिळ (अर्धवेळ)
हिंदी (निवासी) (स्पोन्सरशिप उपलब्ध)

ईश्वरविद्या डिप्लोमा &
Bachelor of Theology

आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५६ वर्षांपासून मान्यता प्राप्त

संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

* ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे *

## -: आमच्या मुख्यालयातील सेवाकार्या :-

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. **एको ऑफ हिज कॉल** : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
३. **बायबलकोर** : मुळभूत बायबल अभ्यासक्रम (इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी)
४. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
५. नहेम्या बायबल कॉलेज : (चेपॉक, संतोषपुरम आणि वेलाचेरी)
६. शाखा चर्च : संतोषपुरम, बालाजी नगर आणि वेलाचेरी
७. महान आज्ञापालनाचे भागीदार : (पाळकांचे नेटवर्क)
८. प्रशिक्षण कार्यक्रम : सेमिनार आणि रीट्रीटो
९. महासभा
१०. छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा
११. शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : प्रकाशने
१२. सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल
१३. रवीवारी शब्बाथ शाळा : सकाळी १०.३० आणि सायंकाळी३ वाजता-रविवारी (चेपॉक, वेलाचेरी, बालाजी नगर आणि संतोषपुरम)
**१४. सकाळची उपासना : रविवारी सकाळी ५.३० वाजता**
**१५. सुरुवातीची उपासना : रविवारी सकाळी ८.०० वाजता**
**१६. तामिळ उपासना : रविवारी सकाळी ८.३० वाजता**
**१७. युवा सभा : रविवारी दुपारी ११.०० वाजता**
**१८. सहभाग भोजन : रविवारी दुपारी १.०० वाजता**
**१९. तेलगु उपासना : सायंकाळी ५ वाजता - रविवारी**
**२०. हिन्दी उपासना : सायंकाळी ४ वाजता - रविवारी**
**२१. तमिळ आणि इंग्रजी उपासना : सायंकाळी ६ वाजता - रविवारी**
२२. अभिप्रायाची वेळ : सायंकाळी ७.३० वाजता - रविवारी
२३. स्त्रियांची प्रार्थना : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी
२४. पुरुषांची प्रार्थना : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी
२५. शिष्यत्त्वाची सभा : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी
२६. गृह प्रार्थना सभा : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी
२७. विशेष प्रभु भोजन : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी
२८. सेवाकाची समालोचन सभा : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार
२९. पालकांची प्रार्थना : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार
३०. रात्रभर प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शुक्रवार
३१. उपवास प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शनिवार
३२. पवित्र सहभागिता : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत
३३. तरुण/तरुणी/लहान लेकरांसाठी प्रार्थना : दररोज रात्री १० वाजता (फोन द्वारा)
३४. कार्यालयीन स्टाफचे मनन : सकाळी ९ वाजता - दररोज
३५. कार्यालय : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून)

## एको ऑफ हिज कॉल

### टपाल द्वारे धर्म शास्त्राचे अभ्यासक्रम

केवळ भारतातील उमेदवारां करीता

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभुत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुवार्तिक, ख्रिस्ती पुढारी आणि अशिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

*अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -*

अध्यक्ष - नहेम्या बाईबल कॉलेज
एको ऑफ हिज कॉल, पोस्ट बॉक्स नं. २९५७,
चिपॉक, चैन्नई - ६०० ००५
फोन : (०४४) २८५२ ८२८२, २८५२ ९२९३,
फोन : ९८४१० ७१८५२, ९५६६१ ३१८५८
E-mail: biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् अॅप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर ''**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**'' च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | |
|---|---|
| **Account Name** | **: ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | **: 1023 2923 805** |
| **Bank Name** | **: STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | **: TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | **: SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | **: SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

# PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

## देव तुम्हाला त्याच्या बोलावण्याप्रती विश्वासू राहावे असे इच्छितो!

**''देव विश्वासू आहे, त्याच्याकडून तुम्ही त्याचा पुत्र येशू ख्रिस्त आपला प्रभू याच्या भागीपणात बोलावलेले होता'' – १ करिंथ १:९.**



१९६९ साली जेव्हा मी प्रभू येशू ख्रिस्ताला माझा वैयक्तिक तारणारा म्हणून स्वीकारले, तेव्हा मी ''द हेरॉल्ड ऑफ हिज कमिंग'' या मासिकाचे संपादक पास्टर एस. देवदासन यांच्या सेवाकार्यात सहभागी झालो. प्रभूची सेवा करण्यासाठी त्यांनी मला आध्यात्मिक प्रशिक्षण दिले, आणि मी तीन वर्षे त्यांच्या मार्गदर्शनाखाली सेवा केली.

एका रात्री आम्ही बराच वेळ एकत्र प्रार्थना करीत असताना, त्यांनी अचानक भविष्यात जग कसे असेल आणि प्रभू माझ्यामार्फत काय कार्य करणार आहे याविषयी बोलायला सुरुवात केली. त्यांनी अशा महान आणि आश्चर्यकारक गोष्टींबद्दल सांगितले, ज्यांची त्या वेळी मी कल्पनाही करू शकत नव्हतो. त्यांनी भविष्यवाणी केलेल्या त्या महान सेवाकार्यांची पूर्तता करण्यासाठी माझ्याकडे ना शैक्षणिक पात्रता होती, ना आर्थिक साधने होती, ना मनुष्यबळ होते.

मी माझ्या अपुरेपणाबद्दल त्यांना सांगितले आणि म्हणालो, पास्टर, प्रभूच्या सेवकांमध्ये सर्वात लहान म्हणून राहिलो तरी माझ्यासाठी ते पुरेसे आहे.

त्यांनी उत्तर दिले, ''एखाद्या सामान्य माणसाला सर्वोच्च उंचीवर नेण्यासाठी दोन गोष्टी आवश्यक असतात: **(अ) विश्वास आणि (ब) स्वच्छ विवेकबुद्धी,** जसे १ तीमथ्य १:१९ मध्ये लिहिले आहे. जसे तुम्ही स्वतःच्या डोळ्यांचे रक्षण करता, तसेच जर तुम्ही या दोन गोष्टी काळजीपूर्वक जपल्या, तर मी आत्ताच उल्लेख केलेली प्रत्येक आध्यात्मिक उंची तुम्ही नक्कीच गाठू शकता.''




प्रभूच्या साहाय्याने, या सर्व वर्षांमध्ये मी या दोन गुणांना जपण्याचा माझ्या परीने पूर्ण प्रयत्न केला आहे.

हा लेख लिहायला सुरुवात करण्याच्या अगदी आधी प्रभू माझ्याशी बोलला. त्याचा कोमल कुजबुजणारा आवाज ऐकताना मी निःशब्द होऊन लक्षपूर्वक ऐकत होतो. तो म्हणाला: ''माझ्या प्रिय पुत्रा, जरा थांब आणि ज्या इमारतीत तू उभा आहेस तिचा विचार कर. तुला हे कसे मिळाले? येथे सुरु असलेल्या सेवाकार्यांचा विचार कर. तळमजल्यावर असलेल्या अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त सुवार्ता छपाईच्या मुद्रणालयाकडे पाहा. जिथे २४ तास प्रार्थना केली जाते अशा पहिल्या मजल्यावर असलेल्या प्रभूच्या मंडळीबद्दल तू विचार केला आहेस का? **नहेम्या बायबल कॉलेजमधील** सेवाकार्यांचा आणि तेथे शिकणाऱ्या मुलींमध्ये होत असलेल्या कार्याचा तू विचार केला आहेस का? दुसऱ्या मजल्यावर असलेल्या **एको ऑफ हिज कॉल** या प्रशासकीय कार्यालयाचा तू विचार केला आहेस का?''

''तुझ्या स्वाभाविक क्षमतेपलीकडील सेवाकार्य पूर्ण करण्यासाठी मी तुला अनेक अहरोन आणि यहोशवा दिले आहेत; तुझ्यापेक्षा अधिक कुशल आणि अधिक सुज्ञ लोक जे प्रत्येक काळात तुला मदत करतील. तू या आशीर्वादांना विसरलास तरीही, मी तुला आठवण करून देतो. जेव्हा मी तुला प्रथम बोलावले, तेव्हा तू काय होतास? आणि आता तू काय आहेस? मी तुझ्या सेवाकार्याचा विस्तार आणखी वाढवीन. माझा सेवक पास्टर एस. देवदासन यांनी तुला शिकविल्याप्रमाणे, विश्वासात आणि स्वच्छ विवेक बुद्धीमध्ये स्थिर राहा. तू कठीण आणि खडतर मार्गांनी जात असताना निराश होऊ नकोस. मी तुला बोलावले आहे नाही का? मी माझ्या मुखाने जे काही बोललो आहे, ते मी माझ्या स्वतःच्या हातांनी पूर्ण करीन. दृढ रहा आणि थकून जाऊ नकोस.''

कधी कधी प्रभू माझ्याद्वारे जे अद्भुत आणि महान कार्य करतो ते मी पूर्णपणे समजू शकत नाही.



प्रिय भाऊ-बहिणींनो, देवाने तुमच्यावर नेमून दिलेल्या नेतृत्वाचे पालन करा. जगाच्या मार्गाने चालू नका. ईश्वरी नेतृत्वाखाली नम्र राहा, आणि तुमचा विश्वास व स्वच्छ विवेकबुद्धी जपून ठेवा. जर तुम्ही देवासमोर सत्यनिष्ठ राहिलात, तर तो तुमच्याद्वारे अद्भुत कार्य करील. देव तुमचा सामर्थ्यानिशी उपयोग करील व त्यापासून तुम्हाला कोणीही रोखू शकणार नाही.

**सर्व महिमा आणि आदर केवळ त्यालाच असो.**

*******

(पान ६ वरुन...)

आपल्याला घडवत नाही, तर तो आपली समज वाढवतो, आपल्याला बळकट करतो आणि आपल्या हेतूंना शुद्ध करतो.

१ शमुवेल १६ मध्ये आपण वाचतो की, दावीदाला सोळाव्या वर्षी राजा म्हणून अभिषिक्त केले गेले, पण प्रत्यक्षात तो फक्त तीसाव्या वर्षीच राजा झाला, जे २ शमुवेल ५:४ मध्ये नमूद करण्यात आले आहे: **"दावीद राज्य करू लागला तेव्हा तो तीस वर्षांचा होता, आणि त्याने चाळीस वर्षे राज्य केले."**

ती अनेक वर्षे लांब आणि संयमाने सहन केलेली होती-तयारीची अशी वर्षे, ज्यांनी त्याला इस्राएलचा सर्वात महान राजा बनण्यासाठी घडवले. राजा दावीदाची कर्तृत्वे विलक्षण होती; त्याने जे साध्य केले ते दुसऱ्या कोणत्याही राजाने केले नाही. त्या प्रतीक्षेच्या काळाने त्याला नम्रता शिकवली - आणि त्याच्याविरुद्ध कट रचणाऱ्यांना क्षमा करायला शिकवले. त्याने त्याला त्याच्या जीवनातील महाकाय संकटांना अढळ धाडसाने सामोरे जाण्यासाठी धैर्य शिकवले. त्याने त्याचा स्वभाव घडवला, आणि त्याला शिकवले की, सर्व गोष्टींपेक्षा पवित्र आत्म्याची उपस्थिती हीच त्याची सर्वात मोठी संपत्ती आहे.

**"तू आपल्या समोरून मला दूर टाकू नको,...."** - स्तोत्र ५१:११.

**"कारण तुझ्या अंगणांमध्ये एक दिवस इतर ठिकाणांतल्या हजार दिवसांपेक्षा उत्तम आहे ; दुष्टपणाच्या डेऱ्यांमध्ये वस्ती करण्यापेक्षा माझ्या देवाच्या घरात त्याच्या दाराच्या उंबरठ्यापाशी राहणे मला बरे वाटते"** - स्तोत्र ८४:१०.

आज तुम्ही कशाची तरी प्रतीक्षा करत आहात का? मग हे जाणून घ्या: देव तुम्हाला अधिक महान गोष्टींसाठी तयार करत आहे.

खंबीर राहा. हिंमत धरा. ठामपणे धरून ठेवा!

## ५. तुमचा शनिवार कायमचा राहणार नाही!

देवाने सामर्थ्यशाली पुनरुत्थानाच्या रविवारीची खात्री दिली असल्यामुळे, तुमचे अंधकारमय शनिवार कायमचे राहणार नाहीत.

शनिवारचा मौन हा तात्पुरती आहे.
शनिवारचे दुःख हे तात्पुरते आहे.
शनिवारचा गोंधळ हा तात्पुरता आहे.
येशू ख्रिस्ताने आधीच घोषित केले



तुम्ही हे देऊळ मोडून टाका, आणि ते मी तीन दिवसांत उठवीन

होते: "......... **तुम्ही हे देऊळ मोडून टाका, आणि ते मी तीन दिवसांत उठवीन"** -योहान २:१९.

तुमच्या मार्गात अडथळा बनलेला जड दगड बाजूला लोटला जाईल. तुमच्या शनिवाराच्या अंधारात प्रकाश झळकून येईल. अभिवचन पूर्ण होईल, आणि तुम्ही कबरेतून बाहेर याल. जर शनिवार असेल, तर नक्कीच रविवारही येईल.

मला लाजरची आठवण येते. तो चार दिवस कबरेत पडून होता - शांतता, प्रतीक्षा आणि पूर्ण निराशेचे ते चार दीर्घ दिवस. सगळं संपल्यासारखं वाटत होतं. पण जेव्हा येशू ख्रिस्त तेथे आला, तेव्हा सर्व काही बदलून गेले.

येशू म्हणाला, **"जर तू विश्वास धरशील तर देवाचे गौरव पाहशील, असे मी तुला सांगितले नाही काय?"** - योहान ११:४०.

प्रिय मित्रांनो, मी अशा अनेक अंधकारमय शनिवारच्या काळामधून गेले आहे. मला माहित आहे की मी काय बोलत आहे. मला ठाऊक आहे की, ते किती भयंकर आणि हृदयविदारक असू शकतात. जोपर्यंत येशू ख्रिस्ताने हस्तक्षेप केला आणि माझ्या "पूर्णविरामाला" "स्वल्पविरामा" मध्ये बदलले नाही, तोपर्यंत त्या समयी मी जवळजवळ आशा सोडून दिली होती. जर तो माझ्यासाठी हे करू शकला तर तो तुमच्यासाठीही ते करू शकतो. लज्जा, पराभव आणि दुःख यांचा लवकरच अंत होईल. लक्षात ठेवा, तुमचा शनिवार तुमच्या कथेचा शेवट नाही.

येशू ख्रिस्त आपल्या जीवनाला उद्देश आणि अर्थ देण्यासाठी या जगात आला. आपण पापात किंवा पराभवात जगावे असा त्याचा कधीही हेतू नव्हता. त्याने आपल्या ऐवजी वधस्तंभावर मृत्यू पत्करला, जेणेकरून आपण विजयी जीवन जगू शकू. आपण आता कशाचेही गुलाम नाही; आपण विजयी आहोत.

जर तुम्ही शनिवारच्या काळात असाल - वाट पाहत असाल, विचार करीत असाल, दुःख सोशीत असाल, तर धीर धरा. शनिवारच्या मौनावस्थेला रविवारच्या विजयात रूपांतरित करणारा तोच देव सध्या तुमच्या आयुष्यात कार्यरत आहे.

शनिवारचे मौन हे पुनरुत्थानाच्या रविवारच्या विजयाइतकेच सामर्थ्यशाली आहे. देवावर विसंबून राहा, आणि त्याच्या अभिवचनांना घट्ट धरून राहा. तुमचा विजयी रविवार येत आहे, मात्र तुमच्या मौन असणाऱ्या शनिवारांना कमी लेखू नका. येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवा. फक्त तोच तुमच्या मौन शनिवारांना विजयी रविवारामध्ये रूपांतरित करू शकतो. तो येणारा राजा आहे!

- **देव मौन असू शकतो, पण तो कधीही निष्क्रिय नसतो.**
- **तो दिसत नसला, तरी तो कधीही अनुपस्थित नसतो.**
- **तो गप्प असू शकतो, पण तो नेहमीच विश्वासयोग्य असतो.**

*****

**कृपया लक्ष द्या**

४ जुलै २०२६ (शनिवार) रोजी **बालार कलाबि निलयम्,** चेन्नई येथे आयोजित करण्यात येणाऱ्या आमच्या **नहेम्या बायबल कॉलेजेसच्या** पदवीप्रदान समारंभात कृपया सहभागी व्हा.

**Special Guest:**
**REV. DR. S.J. KINGSLEY,**
**(COO, JESUS CALLS)**

१ जून २०२६ पासून सुरू होणाऱ्या पुढील शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी समर्पित विद्यार्थ्यांना आमच्या महाविद्यालयात पाठवण्याची आम्ही तुम्हाला विनंती करतो. **- प्राचार्य**

Posted at "Egmore RMS Patrika Channel" RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## OUR BANK DETAILS:

### 1. Bank : State Bank of India

| | |
|---|---|
| Branch | : Triplicane, Chennai-5 |
| Name | : S. Sam Selva Raj |
| A/C No. | : 1023 2934 679 |
| IFSC | : SBIN 00 00 249 |

SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

### 2. Bank : ICICI Bank

| | |
|---|---|
| Branch | : Anna Salai, Chennai-6 |
| Name | : Echo of His Call |
| A/C No. | : 6038 0502 2319 |
| IFSC | : ICIC 000 6038 |

### 3. Bank : State Bank of India

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

| | |
|---|---|
| Branch | : Triplicane, Chennai-5 |
| Name | : Echo of His Call Educational Trust |
| A/C No. | : 1023 2923 805 |
| IFSC | : SBIN 00 00 249 |

## OUR QR CODE:

ECHO OF HIS CALL

Scan to pay with any UPI app

State Bank of India

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**
*****
E.mail : sam@echoofhiscall.org

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य, गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-  आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.org

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26
WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26
Date of Publication: Second week of every month
Date of Posting : 11th & 12th of every month
Posted at "Egmore RMS Patrika Channel"
on 13th APRIL 2026.
If un-delivered please return to:
ECHO OF HIS CALL (MARATHI)
P.O. Box No. 2957,
Chepauk, Chennai - 600 005, INDIA.
Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766

*JESUS LOVES YOU!*

To

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers**, New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**